नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज़

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे | Year - 4rd | अंक - १५ | Issue - 15 | वार - मंगळवार दि. ९ जून २०२६ | Blow- Tuesday Date 9 JUNE 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# वितळलेले स्टील अंगावर पडून ८ कामगारांचा मृत्यू

## आंध्र प्रदेशच्या विशाखापट्टण येथील स्टील कारखान्यात भीषण दुर्घटना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हैदराबाद : आंध्र प्रदेशच्या विशाखापट्टण येथील स्टील कारखान्यात भीषण दुर्घटना घडली असून वितळ-ून गेलेल्या स्टीलमुळे कंपनीतील ८ कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. वितळवण्यात आलेल्या स्टीलचा मोठा साठा एका क्रेनच्या सहाय्याने एका ठिकाणाहून दुसरीकडे नेत असताना स्टीलचा लाव्हा खाली पडल्याने ही अंगावर थरकाप उडवणारी घटना घडली.

गरम वितळलेलं स्टील कामगारांच्या अंगावर पडल्याने त्यांचा मृत्यू झाला. मात्र, या घटनेनं कंपनीतील कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न उपस्थित झाला असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

विशाखापट्टणम स्टील प्लांटमध्ये म ोठी दुर्घटना घडली असून, वितळलेल्या लोखंडाची गळती झाल्याने ८ कामगारांचा जागीच मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेत अनेक कामगार जखमी झाले आहेत. अत्यंत उच्च तापम ानावर वितळलेल्या पोल-ादाने भरलेल्या करछुलीमध्ये (लॅडलमध्ये) झालेल्या स्फोटामुळे हा अपघात घडला. दुर्घटनेनंतर प्लांटम ध्ये एकच गोंधळ उडाला, दुर्घटनेनंतर कामगार आपला जीव वाचवण्यासाठी सैरावैरा पळू लागले होते. दरम्यान, स्टील प्लांटचे कर्मचारी घटनास्थळी पोहोचून आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न करत आहेत.



मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त करत मृतांना श्रद्धांजली वाहिली. तसेच, घटनास्थळी उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संवाद साधून मृतांच्या कुटुंबीयांप्रती सहवेदना व्यक्त केल्या. अधिकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांना घटनास्थळावरील सद्यस्थिती तसेच सुरू असलेल्या बचाव आणि मदतकार्याची माहिती दिली. नायडूंनी सर्व शासकीय विभागांना समन्वयाने काम करण्याचे निर्दे श दिले असून, बचाव आणि मदतकार्य वेगाने व प्रभावीपणे पूर्ण करण्याच्या सूचना केल्या आहेत.

राज्याच्या गृहमंत्री वंगलापुडी अनीता यांनी विशाखापट्टणम स्टील प्लांटमधील दुर्घटनेबाबत प्रतिक्रिया दिली. तसेच, जिल्हाधिकारी आणि पोलीस आयुक्तांशी दूरध्वनीवरून संपर्क साधून दुर्घटनेची माहिती घेत सूचनाही केल्या आहेत. गृहमंत्र्यांच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, जखमींना सर्वोत्तम वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्याचे तसेच दुर्घटनास्थळी बचाव आणि मदतकार्य वेगाने राबविण्याचे निर्देश दिले आहेत. घटनेची माहिती मिळताच गृहमंत्री तातडीने दुर्घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवर संपर्क ठेवून परिस्थितीचा आढावा घेत असून आवश्यक त्या सूचना देत आहेत.

# तृणमूल काँग्रेसचे २० बंडखोर खासदार भाजपच्या वाटेवर



नवी दिल्ली : आमदारांच्या पाठोपाठ तृणमूल काँग्रेसच्या खासदारांनीही ममता बॅनर्जी यांना सोडून दिले आहे. पीटीआय या वृत्तसंस्थेनुसार, २८ पैकी २० लोकसभा खासदारांनी एनडीए सरकारला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. खासदार आणि म ाजी टीएमसी नेत्या काकोली घोष दस्तीदार यांनी सोमवारी हाच दावा केला. त्यांनी सांगितले की, या २० खासदारांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांना एनडीएला पाठिंबा कळवला आहे. लवकरच अध्यक्षांना पत्र पाठवले जाईल. यापैकी ११ खासदारांनी सोमवारी दुप-ारी केंद्रीय मंत्री आणि भाजपचे बंगाल प्रभारी भूपेंद्र यादव यांच्या निवासस्थानी बैठक घेतली. बंगालचे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनीही त्यांची भेट घेतली.

या बैठकीला लोकसभा खासदार काकोली घोष, शताब्दी रॉय, अबू ताहेर, अरूप चक्रवर्ती, खलीलुर रहमान, शर्मिला सरकार, असित म ाल, कालीपदा सोरेन, जगदीश बसुनिया आणि प्रसून बॅनर्जी उपस्थित होते. सध्या टीएमसीचे लोकसभेत २८ आणि राज्यसभेत १३ खा-सदार आहेत. यापूर्वी, ३ जून रोजी बंगालच्या ८० आमदारांपैकी ५८ आमदारांनी एक वेगळा गट स्थापन केला होता. या गटाने ऋतब्रता यांना आपला नेता म्हणून नियुक्त केले. रात्री उशिरा टीएमसी खासदारांची एक बैठकही झाली, ज्यात फोटो काढण्यावरून वाद निर्माण झाला. पीटीआय या वृत्तसंस्थेनुसार, रविवारी रात्री उशिरा दिल्लीत एका अज्ञात ठिकाणी २० टीएमसी खासदारांनी एक अनौपचारिक बैठक घेतली. खासदारांनी सध्याच्या नेतृत्व व्यवस्थेवर असमाधान व्यक्त केले.

या बैठकीचा एक फोटो सोशल मीडियावर समोर आला. त्यात अनेक टीएमसी खासदार एका टेबलाभोवती बसलेले दिसत आहेत. एका खासद-ाराने फोटो काढल्यावरून वाद निर्माण झाला. या फोटोमध्ये सुखेंदू शेखर राय हेदेखील बसलेले दिसत आहेत.

प्रश्न: टीएमसी खासदारांना पक्षांतरबंदी कायदा लागू होईल का? उत्तर: टीएमसीचे लोकसभेत एकूण २८ खासदार आहेत. जर २० खासदारांच्या बंडखोर गटाने स्वतःला एक स्वतंत्र पक्ष किंवा लोकसभेतील मूळ टीएमसी पक्ष म्हणून घोषित केले, तर त्यांना पक्षांतरबंदी कायदा लागू होणार नाही, कारण या बंडखोर गटाला दोन-तृतीयांश खासदारांचा पाठिंबा आहे.

प्रश्न: टीएमसीच्या २० खासदारांच्या पाठिंब्याने एनडीएचे संख्याबळ वाढेल का?

उत्तर: होय, वाढेल. सध्या लोकसभेतील एकूण ५४३ खासदारांपैकी एनडीएचे २९३ खा-सदार आहेत. या २० खासदारांच्या पाठिंब्याने ही संख्या ३१३ होईल.

एनडीएला कोणते फायदे मिळतील?

उत्तर: कोणतेही विधेयक मंजूर करणे सोपे होईल. सरकार मतदारसंघ पुनर्रचना विधेयक आणि संबंधित महिला आरक्षण विधेयक मंजूर करू शकते. १८ एप्रिल रोजी जेव्हा मतदारसंघ पुनर्रचना विधेयकावर (पान २ वर....)

# भारतीय संघाचा तिसऱ्याच दिवशी कसोटी सामन्यात विजय, अफगाणिस्तानचा एक डाव अन् ३०० धावांनी धुव्वा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चंदीगड : मुल्लांपूर (न्यू चंदीगड) येथील महार-ाजा यादविंद्र सिंह आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील एकम ेव कसोटी सामना खेळला गेला. या सामन्यात भारतीय संघाने अफगाणिस्तानचा एक डाव आणि ३०० धावांनी दणदणीत पराभव करत एकतर्फी वर्चस्व गाजवलं आहे.

अफगाणिस्तानचा पहिला डाव अवघ्या १५२ धावांवर संपुष्टात. भारताने पहिल्या डावात उभारलेल्या प्रचंड धावसंख्येमुळे यजमान संघाला ४१२ धावांची भक्कम आघाडी मिळाली. त्यामुळे अफगाणिस्तानवर फॉलोऑनची नामुष्की ओढवली.

दुसऱ्या डावातही अफगाण फलंदाज भारतीय गोलंदाजांसमोर टिकू शकले नाहीत. संपूर्ण संघ केवळ ११२ धावांत गारद झाला आणि भारताने सामना सहज खिशात घातला. या विजयाचा सर्वात मोठा शिल्पकार ठरला पदार्पणवीर मानव सुथार. आपल्या पहिल्याच कसोटीत त्याने प्रभावी गोलंदाजी करत अफगाणिस्तानच्या फलंदाजीची अक्षरशः दाणादाण उडवली. सुथारच्या भेदक फिरकीसमोर अफगाण फलंदाज हतबल दिसले.

भारताने या विजयासह कसोटी क्रिकेटमधील आपले वर्चस्व पुन्हा एकदा अधोरेखित केले, तर मानव सुथारने शानद-ार पदार्पण करत भविष्यासाठी दमदार दावेदारी सादर केली. कर्णधार शुबमन गिल याने टॉस जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला.

टीम इंडियासाठी पहिल्या डावात दोघांनी शतकं आणि तिघांनी अर्धशतकं ठोकलं. या जोरावर टीम इंडियाने दुसऱ्या दिवशी पहिला डाव हा १२७ ओव्हरमध्ये ८ आऊट ५६४ रन्सवर घोषित केला. टीम इंडियासाठी शुबमन गिल आणि के एल राहुल या दोघांनी शतक ठोकलं. शुबमनने १२६ तर के एलने १० धावा केल्या.

तसेच साई सुदर्शन आणि ऋषभ पंत या दोघांनी प्रत्येकी ८१ धावा केल्या. तसेच वॉशिंग्टन सुंदर याने नाबाद ५२ धावांचं योगदान दिलं. तर इतरांनीही छोटी खेळी करत भारताला ५५० पार पोहचवण्यात हातभार लावला. अफगाणिस्तानासाठी मोहम्मद सलीम साफी याने सर्वाधिक ६ विकेट्स मिळवल्या.

अफगाणिस्तानला पहिल्या डावात काही खास करता आलं नाही. भारताने अफगाणिस्तानला ५८.४ ओव्हरमध्ये १५२ रन्सवर ऑलआऊट केलं. अफगाणिस्तानसाठी रहमत शाह याने सर्वाधिक ६० रन्स केल्या. तर कॅप्टन हशमतुल्लाह शाहीदी याने २० धावांचं योगदान दिलं. त्याव्यतिरिक्त कुणालाही २० हा आकडा गाठता आला नाही.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांची सरकारी रुग्णालयात अचानक तपासणी, अस्वच्छतेवरून डॉक्टरांना झापलं



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कामाची स्टाईल, कामाचा धडाका आणि प्रशासनावर अस-लेली मजबूत पकड महाराष्ट्राला परिचित होती. कामचुकारपणा, बेशिस्तपणा आणि अस्वच्छता ते कदापि खपवून घेत नसतं. त्यामुळेच, बारामतीमध्ये अगदी सकाळी सकाळीसुद्धा सर्वकाही शिस्तबद्ध आणि स्वच्छ असायचं. येथील शासकीय संस्थेत एक शिस्त होती, अजित पवारांचा दरारा होता. आता, अजित पवारांच्या निधनानंतर त्यांच्या जागी उपमुख्यमंत्रीपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर पहिल्यांदाच सुनेत्रा पवारांच्या कार्यपद्धतीत अजित दादांची स्टाईल पाहायला मिळाली. सुनेत्रा पवारांनी महिला कर्मचाऱ्यांना चांगलाच दम भरल्याचा व्हिडिओ समोर आला आहे. कोणताही गाजावाजा नाही, कोणतीही पूर्वसूचना नाही. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी काल बाराम ती येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय रुग्णालयाला अचानक भेट देत तेथील आरोग्य सेवांचा प्रत्यक्ष आढावा घेतला. रुग्णालयातील विविध विभागांना भेट देत त्यांनी रुग्णांना मिळणाऱ्या सुविधा, स्वच्छतेची स्थिती, औषधांचा पुरवठा तसेच एकूण व्यवस्थापनाची सखोल माहिती घेतली. रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांशी संवाद साधून त्यांनी त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. तसेच कामात हलगर्जीपणा करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सक्त ताकीद देत जबाबदारीने व तत्परतेने काम करण्याच्या सूचनाही दिल्या.

रुग्णालयाची पाहणी करताना सुनेत्रा पवारांना काही ठिकाणी अस्वच्छता दिसून आली, त्यावेळी तेथील कर्मचारी महिलांना त्यांनी चांगलच झापलं. ही काय घाण आहे, इथं उशी पडलेली दिसतेय. काय करता दिवसभर, फक्त मोबाईल बघता का? अशा शब्दात सुनेत्रा पवारांनी रुग्णालयातील महिला कर्मचाऱ्यांची झाडाझडती घेतली. तसेच, येथील डॉक्टरांसह अधिकाऱ्यांनाही दम भरला. रुग्णालय परिसरात स्वच्छता राखण्याबाबतही त्यांनी प्रशासनाला कडक निर्देश दिले.




## संपादकीय....

# अनपेक्षित भेट

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कामाची स्टाईल, कामाचा धडाका आणि प्रशासनावर असलेली मजबूत पकड महाराष्ट्राला परिचित होती. कामचुकारपणा, बेशिस्तपणा आणि अस्वच्छता ते कदापि खपवून घेत नसतं. त्यामुळेच, बारामतीमध्ये अगदी सकाळी सकाळीसुद्धा सर्वकाही शिस्तबद्ध आणि स्वच्छ असायचं. येथील शासकीय संस्थेत एक शिस्त होती, अजित पवारांचा दरारा होता. आता, अजित पवारांच्या निधनानंतर त्यांच्या जागी उपमुख्यमंत्रीपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर पहिल्यांदाच सुनेत्रा पवारांच्या कार्यपद्धतीत अजित दादांची स्टाईल पाहायला मिळाली. सुनेत्रा पवारांनी महिला कर्मचाऱ्यांना चांगलाच दम भरल्याचा व्हिडिओ समोर आला आहे. कोणताही गाजावाजा नाही, कोणतीही पूर्वसूचना नाही. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी काल बारामती येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय रुग्णालयाला अचानक भेट देत तेथील आरोग्य सेवांचा प्रत्यक्ष आढावा घेतला. रुग्णालयातील विविध विभागांना भेट देत त्यांनी रुग्णांना मिळणाऱ्या सुविधा, स्वच्छतेची स्थिती, औषधांचा पुरवठा तसेच एकूण व्यवस्थापनाची सखोल माहिती घेतली. रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांशी संवाद साधून त्यांनी त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. तसेच कामात हलगर्जीपणा करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सक्त ताकीद देत जबाबदारीने व तत्परतेने काम करण्याच्या सूचनाही दिल्या. रुग्णालयाची पाहणी करताना सुनेत्रा पवारांना काही ठिकाणी अस्वच्छता दिसून आली, त्यावेळी तेथील कर्मचारी महिलांना त्यांनी चांगलच झापलं. ही काय घाण आहे, इथं उशी पडलेली दिसतेय. काय करता दिवसभर, फक्त मोबाईल बघता का? अशा शब्दात सुनेत्रा पवारांनी रुग्णालयातील महिला कर्मचाऱ्यांची झाडाझडती घेतली. तसेच, येथील डॉक्टरांसह अधिकाऱ्यांनाही दम भरला. रुग्णालय परिसरात स्वच्छता राखण्याबाबतही त्यांनी प्रशासनाला कडक निर्देश दिले.

# 'झिरो टॉलरन्स'ची मुंढे स्टाईल



महाराष्ट्रात अन्नपदार्थांमधील भेसळ हा दिवसेंदिवस गंभीर होत चाललेला विषय आहे. दूध, तूप, पनीर, खाद्यतेल, मसाले, मिठाई, बिस्किटे, पेये आणि अगदी औषधांपर्यंत अनेक वस्तूंमध्ये भेसळ होत असल्याच्या घटना सातत्याने समोर येत आहेत.अशा परिस्थितीत नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाचे (FD) आयुक्त तुकाराम मुंढे यांनी राज्यभर भेसळखोरांविरोधात धडक मोहीम सुरू केली आहे.त्यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे भेसळ करणाऱ्या टोळ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून सर्वसामान्य नागरिकांमध्ये समाधानाची भावना निर्माण झाली आहे.भेसळ हा केवळ कायद्याचा भंग नसून तो जनतेच्या आरोग्यावर होणारा थेट हल्ला आहे.नफखोरीच्या हव्यासापोटी काही व्यापारी आणि उत्पादक नागरिकांच्या जीवाशी खेळत आहेत. निकृष्ट दर्जाचे तेल, कृत्रिम रसायने वापरून तयार केलेले दूध, बनावट पनीर,रंग मिसळलेले मसाले आणि कालबाह्य पदार्थ नव्याने पॅक करून विकण्याचे प्रकार अनेकदा उघडकीस आले आहेत. यामुळे पचनाचे विकार, यकृताचे आजार,कर्करोग आणि इतर गंभीर आरोग्य समस्या निर्माण होण्याचा धोका वाढतो. तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अन्न व औषध प्रशासनाची यंत्रणा अधिक सक्रिय झाल्याचे दिसून येत आहे. राज्यातील विविध शहरांमध्ये आणि ग्रामीण भागांमध्ये अचानक छापे टाकून भेसळयुक्त पदार्थांचा साठा जप्त करण्यात येत आहे. अनेक कारखाने,गोदामे आणि दुकाने तपासण्यात आली असून लाखो रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे. राज्यभर अन्न व औषध प्रशासन विभागाने गुटखा,पानमसाला विक्रेत्यांविरोधात दोन दिवसात चाळीस ठिकाणी छापेमारी करून कारवाई केली आहे. तसेच फसव्या जाहिराती करणाऱ्या सेलिब्रिटी यांना देखील मुंढे यांनी कडक ईशारा दिला आहे.अनेक ठिकाणी नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात येत आहे.त्यामुळे कायद्याचा धाक निर्माण होण्यास मदत होत आहे. विशेष म्हणजे ही मोहीम केवळ मोठ्या उद्योगांपुरती मर्यादित नसून सर्व स्तरांवरील अन्नव्यवसायिकांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.रस्त्यावरील खाद्यपदार्थ अगदी वडापाव विक्रेत्यांपासून मोठ्या उत्पादक कंपन्यांपर्यंत सर्वांची तपासणी केली जात आहे. अन्नसुरक्षेच्या नियमांचे पालन होत आहे की नाही,याची काटेकोरपणे पडताळणी केली जात आहे. नागरिकांना सुरक्षित आणि दर्जेदार अन्न मिळावे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. भेसळ रोखण्यासाठी केवळ प्रशासनाची कारवाई पुरेशी नाही. यासाठी ग्राहकांनी देखील जागरूक होणे आवश्यक आहे. वस्तू खरेदी करताना उत्पादनाची तारीख,गुणवत्ता चिन्हे,परवाना क्रमांक आणि पॅकिंगची माहिती तपासणे गरजेचे आहे. संशयास्पद पदार्थ आढळल्यास त्याची तक्रार अन्न व औषध प्रशासनाकडे करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. नागरिकांचा सहभाग वाढल्यास भेसळखोरांना रोखणे अधिक सोपे होईल. याशिवाय फार्मासिस्ट नसलेली मेडिकल दुकाने सील करा असे कडक आदेश तुकाराम मुंढे यांनी दिले आहेत. आज महाराष्ट्रासमोर आरोग्यदायी समाज घडविण्याचे मोठे आव्हान आहे. त्यासाठी अन्नसुरक्षा ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेली भेसळविरोधी मोहीम ही जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आणि स्वागतार्ह पाऊल आहे. या मोहिमेमुळे भेसळखोरांवर अंकुश बसण्यास मदत होईल, तसेच अन्न व्यवसायात प्रामाणिकपणा आणि पारदर्शकता वाढेल. भेसळमुक्त महाराष्ट्र हे केवळ प्रशासनाचे ध्येय नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. शासनाची कठोर भूमिका, प्रशासनाची कार्यक्षमता आणि नागरिकांची जागरूकता यांचा संगम साधला तरच खऱ्या अर्थाने भेसळमुक्त महाराष्ट्राची निर्मिती होऊ शकेल. तुकाराम मुंढे यांनी सुरू केलेली ही मोहीम त्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण आणि आशादायी पाऊल मानावे लागेल.

**– केतन द.भोज (मुंबई सदस्य – मराठी वृत्तपत्र लेखक संघ,मुंबई)**

## तृणमूल काँग्रेसचे २० बंडखोर खासदार भाजपच्या वाटेवर

(पान १ वरून...) मतदान झाले, तेव्हा विधेयकाच्या बाजूने २९८ मते पडली होती. विधेयक मंजूर करण्यासाठी ३५२ मतांची आवश्यकता होती. याचा अर्थ विधेयक ५२ मतांनी नामंजूर झाले. जर २० टीएमसी खासदार एनडीएमध्ये सामील झाले, तर दोन-तृतीयांश बहुमत मिळवण्यासाठी आणखी ३२ खासदारांची आवश्यकता असेल. टीएमसीचे ज्येष्ठ नेते सुखेंदू शेखर यांनी आज सकाळी आपल्या राज्यसभा पदाचा राजीनामा देऊन पक्ष सोडला. आपल्या राजीनामा पत्रात, त्यांनी पक्षाच्या पराभवासाठी ममता बॅनर्जी यांच्या १५ वर्षांच्या राजवटीला जबाबदार धरले आणि भाजपची प्रशंसा केली.

# राज्यसभेचे नूतन खासदार रामरावजी वडकुते यांचे नितीन काळे यांनी केले स्वागत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राज्यसभेचे नूतन खासदार रामरावजी वडकुते हे अचानक पंढरपूर दौऱ्यावर आले असता त्यांचे कार्यकर्त्यांच्या वतीने पंढरपूर येथे जोरदार स्वागत करण्यात आले. त्यांची निवड झाल्यापासून हा पंढरपूरचा दुसरा दौरा झाला आहे. खासदार वडकुते यांची निवड झाल्यापासून त्यांचे संपूर्ण महाराष्ट्रात जंगी स्वागत केले जात आहे. खासदार वडकुते यांचे निकटवर्तीय म्हणून नितीन काळे यांना महाराष्ट्रभर आेळखले जाते. त्यांच्या सहवासात काळे यांनी अनेक वर्ष काम केले आहे. काळे यांनी पत्रकारांशी बोलताना असे सांगितले की रामरावजी वडकुते साहेब हे एक आदर्श व्यक्तिमत्व असून त्यांनी समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी सभागृहात अनेक प्रश्न मांडले होते व न्याय मिळवून दिला होता आता त्यांची देशाच्या वरिष्ठ सभागृहात त्यांना काम करण्याची संधी मिळाली आहे नक्कीच ही आम्हा कार्यकर्त्यांसाठी अभिमानाची बाब आहे समाजातील अनेक प्रश्न अनेक व्यथा नक्कीच साहेब वरिष्ठ सभागृहात सोडविण्यासाठी प्रयत्न करतील निवड झाल्यापासून एक दिवसही न थांबता समाजाच्या हितासाठी समाजाच्या अनेक अडचणी जाणून घेण्यासाठी संपूर्ण ते महाराष्ट्रभर दौरा करीत आहे त्यामुळे नक्कीच सर्वांना न्याय मिळेल असे काळे यांनी उद्गार काढले. तसेच रामरावजी वडकुते यांची संसदेच्या गृहनिर्माण व शहरी व्यवहार विषयक संसदीय स्थायी समितीवर सदस्य पदी नियुक्ती झाल्याबद्दल विश्वभूषण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठानच्या वतीने



वडकुते यांना विशेष सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी उपस्थित मा नगरसेवक डी राज सर्वगोड नितीन काळे प्राचार्य विजयकुमार वाघमोडे शिवाजी घाडगे रबदाडे मामा काशिलिंग चौगुले रामदास नागटिळक संग्राम जाधव आदम बागवान विठ्ठल ढगे अनिल लवटे सर मल्हारी खरात सुरेश नवले व अनेक मान्यवर उपस्थित होते..

# श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर कर्मचाऱ्यांची सहकारी पतसंस्था मर्यादित, पंढरपूरच्या चेअरमनपदी नारायण देवकुळे व व्हाईस चेअरमनपदी सविता रणदिवे यांची बिनविरोध निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर कर्मचाऱ्यांची सहकारी पतसंस्था मर्यादित, पंढरपूर या संस्थेच्या संचालक मंडळाची विशेष सभा सोमवार दि. ०८ जून रोजी सकाळी ११.०० वाजता तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पंढरपूर यांच्या कार्यालयात संपन्न झाली. सदर सभेच्या अध्यक्षस्थानी एस. टी. तेलंगरे, अध्यासी अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पंढरपूर हे उपस्थित होते.





सभेस संस्थेचे संचालक बलभिम पावले, चंद्रकांत कोळी, तुकाराम कुलकर्णी, राजेंद्र सुभेदार, पांडूरंग कोले, सुनंदा देवकते, पांडूरंग बुरांडे, नारायण देवकुळे, सविता रणदिवे तसेच संस्थेचे सचिव श्री. सुरज सुधाकर तेली व सुशिलकुमार ढेकळे पाटील उपस्थित होते.

संस्थेचे विद्यमान चेअरमन बलभिम राजाराम पावले व व्हाईस चेअरमन चंद्रकांत धर्माण्णा कोळी यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या चेअरमन व व्हाईस चेअरमन पदांच्या निवडीसाठी ही विशेष सभा आयोजित करण्यात आली होती.

नियमानुसार निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यात आली. चेअरमन पदासाठी नारायण मच्छिंद्र देवकुळे यांचा तर व्हाईस चेअरमन पदासाठी सविता संजय रणदिवे यांचा अर्ज प्राप्त झाला. दोन्ही पदांसाठी अन्य कोणताही उमेदवारी अर्ज प्राप्त न झाल्याने अध्यासी अधिकारी एस. टी. तेलंगरे यांनी श्री. नारायण मच्छिंद्र देवकुळे यांची चेअरमनपदी तसेच सविता संजय रणदिवे यांची व्हाईस चेअरमनपदी बिनविरोध निवड झाल्याची अधिकृत घोषणा केली.

निवड जाहीर होताच उपस्थित संचालक व सभासदांनी नूतन पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. यावेळी नूतन चेअरमन नारायण देवकुळे यांनी संस्थेच्या आर्थिक प्रगतीसाठी, सभासदांच्या हितासाठी आणि पतसंस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व संचालकांना विश्वासात घेऊन कार्य करण्याची ग्वाही दिली. तसेच नूतन व्हाईस चेअरमन सविता रणदिवे यांनी संस्थेच्या प्रगतीसाठी व सभासदांच्या कल्याणासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

या निवडीबद्दल मंदिर समितीचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, पतसंस्थेचे सभासद तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून नूतन पदाधिकाऱ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# वय लहान, स्वप्न मोठे! प्रचित भवरने तीन तासांत सर केला हरिश्चंद्रगड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : वय लहान असले तरी स्वप्न मोठे असावेत आणि ती पूर्ण करण्यासाठी जिद्द हवी, याचे जिवंत उदाहरण म्हणजे प्रचित भवर. अवघ्या चौथ्या वर्षी त्याने गाठलेले हे शिखर भविष्यातील अनेक यशस्वी मोहिमांची नांदी ठरणार आहे, यात शंका नाही.

शिवडीच्या प्रचित भवरची दैदिप्यमान कामगिरी

इच्छाशक्ती, जिद्द आणि साहसाची आवड असेल तर वय कधीच आड येत नाही, याचा प्रत्यय नाशिक जिल्ह्यातील एका चार वर्षीय चिमुकल्याने आपल्या





कर्तृत्वातून घडवून आणला आहे. निफाड तालुक्यातील शिवडी येथील मूळ रहिवासी व सध्या ओझर येथे वास्तव्यास असलेल्या सचिन भवर यांचा अवघ्या चार वर्षांचा मुलगा प्रचित सचिन भवर याने महाराष्ट्रातील दुर्गम आणि आव्हानात्मक समजल्या जाणाऱ्या हरिश्चंद्रगडाची यशस्वी चढाई अवघ्या तीन तासांत पूर्ण करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

कळसुबाई-हरिश्चंद्रगड अभयारण्य परिसरातील हरिश्चंद्रगड हा त्याच्या उंची, खडतर चढाई आणि निसर्गरम्य पण आव्हानात्मक वाटांसाठी प्रसिद्ध आहे. अनुभवी ट्रेकर्सनाही या गडाची चढाई करताना मोठी कसरत करावी लागते. मात्र, बालवयातच साहसाची आवड जोपासणाऱ्या प्रचितने आपल्या चिमुकल्या पावलांनी हा गड अत्यंत उत्साहाने आणि आत्मविश्वासाने सर करत एक अनोखा विक्रम आपल्या नावावर केला.

गडाच्या चढाईदरम्यान अनेक कठीण टप्पे, चढ-उतार आणि दमछाक करणारे मार्ग पार करताना प्रचितने कुठेही थकव्याची चिन्हे दाखवली नाहीत. उलट प्रत्येक टप्पा पार करताना त्याचा उत्साह अधिकच वाढत गेला. गडाच्या माथ्यावर पोहोचल्यानंतर त्याच्या चेहऱ्यावर झळकणारा आनंद आणि विजयाचा भाव उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.

प्रचितच्या या यशामागे त्याच्या पालकांचे मोलाचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन असल्याचे दिसून येते. त्याचे वडील सचिन ज्ञानेश्वर भवर हे विक्रीकर विभागात विक्रीकर निरीक्षक (एसटीआय) म्हणून कार्यरत असून, आई प्रियंका भवर या शिक्षिका आहेत. साहस, शिस्त आणि निसर्गप्रेमाचे संस्कार बालपणापासूनच प्रचितला मिळाल्याने त्याच्यातील धाडसी वृत्ती अधिक बळकट झाली.

अवघ्या चार वर्षांच्या वयात प्रचितने केलेली ही कामगिरी केवळ बालसाहसाचा आदर्श नसून मोठ्यांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे. त्याच्या या यशामुळे निफाड, शिवडी आणि ओझर परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, विविध सामाजिक संस्था, शिवप्रेमी, ट्रेकर्स आणि नागरिकांकडून त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पंढरपूर सायकलर्स क्लबचा ८ वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : जागतिक सायकल दिन (३ जून) व जागतिक पर्यावरण दिन (५ जून) यांचे औचित्य साधून पंढरपूर सायकलर्स क्लबचा ८ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात व जल्लोषात संपन्न झाला. सकाळी आयोजित करण्यात आलेल्या भव्य सायकल जनजागृती रॅलीला सायकलप्रेमी व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पर्यावरण संवर्धन, निरोगी जीवनशैली आणि वाहतूक कोंडी व प्रदूषणमुक्त शहराचा संदेश देत शेकडो सायकलस्वारांनी रॅलीत सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमास क्लबचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री. उमेश मालक परिचारक यांच्यासह मा. श्री. प्रशांत डगळे साहेब (उपविभागीय पोलीस अधिकारी, पंढरपूर), मा. श्री. महेश रोकडे साहेब (मुख्याधिकारी, पंढरपूर नगरपालिका), मा. श्री. गणेश पाटील, मा. श्री. शशिकांत कराळे,मा. श्री. प्रथमेश वांगीकर सर, तसेच सायंकाळच्या सन्मान सोहळ्यास मा. श्री. प्रशांत खलिपे, मा. श्री. प्रणव परिचारक, मा. श्री. शार्दूल नलबिलवार आणि मा. श्री. जहूर खतिब यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

सायंकाळी पंतनगर कार्यालय येथे आयोजित सन्मान सोहळ्यात पर्यावरण संरक्षण, आरोग्य जागृती आणि सायकल संस्कृतीच्या प्रसारासाठी कार्य करणाऱ्या सायकलवीरांना पर्यावरण रक्षक सायकल मित्र पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी मान्यवरांनी सायकल ही काळाची गरज असल्याचे सांगत जास्तीत जास्त नागरिकांनी दैनंदिन जीवनात सायकलचा वापर वाढविण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमात बोलताना उपस्थित मान्यवरांनी पंढरपूर सायकलर्स क्लब गेली आठ वर्षे सातत्याने आरोग्य, पर्यावरण आणि सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबवत असल्याबद्दल कौतुक व्यक्त केले. भविष्यात सायकल चालविणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली पाहिजे, प्रत्येक कुटुंबाने सायकलचा स्वीकार केला पाहिजे आणि तरुण पिढीने सायकलकडे केवळ छंद म्हणून नव्हे तर जीवनशैली म्हणून पाहिले पाहिजे, असे मत व्यक्त करण्यात आले.

यावेळी क्लबतर्फे सायकल बँक ही अभिनव संकल्पना मांडण्यात आली. घरात वापरात नसलेल्या सायकली संकलित करून त्या गरजू विद्यार्थी, कामगार व नागरिकांना उपलब्ध करून देण्याचा उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त करण्यात आला. या सामाजिक उपक्रमाचे उपस्थितांनी जोरदार स्वागत केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पंढरपूर सायकलर्स क्लबचे सर्व पदाधिकारी, सदस्य, सायकलवीर व स्वयंसेवक यांनी अथक परिश्रम घेतले. या वर्धापन दिनानिमित्त स्वच्छ पंढरपूर - सुंदर पंढरपूर - तंदुरुस्त पंढरपूर हा संदेश प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचविण्यात आला.

पर्यावरण रक्षण, आरोग्य संवर्धन आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश देणारा हा वर्धापन दिन सोहळा नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे अविस्मरणीय ठरला.

# पडघा पोलिसांच्या वतीने 'फिट इंडिया सायक्लोथॉन २०२६' उत्साहात संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : केंद्र सरकारच्या 'फिट इंडिया' अभियानाला अधिक प्रभावीपणे चालना देण्यासाठी पडघा पोलीस ठाणे, ठाणे ग्रामीण यांच्या वतीने रविवारी 'फिट इंडिया सायक्लोथॉन २०२६' या भव्य सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. आरोग्य, तंदुरुस्ती आणि नियमित व्यायामाचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला अधिकारी, कर्मचारी तसेच स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

रविवार, दि. ७ जून २०२६ रोजी सकाळी ७ वाजता पडघा पोलीस ठाणे येथून सायकल रॅलीला प्रारंभ करण्यात आला. सुमारे ३० किलोमीटर अंतराची ही रॅली पडघा पोलीस स्टेशन, पडघा टोल नाका, कुरुंद, खालिंग, मुऱ्हे आदी मार्गांवरून पार पडली. रॅलीदरम्यान सहभागी झालेल्या सायकलपटूंनी शिस्तबद्ध पद्धतीने मार्गक्रमण करत नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

'फिटनेस का डोस, आधा घंटा रोज' आणि 'जो फिट है वो हिट है' या घोषवाक्यांच्या माध्यमातून नियमित व्यायाम, सायकलिंग आणि आरोग्यदायी जीवनशैलीचे महत्त्व नागरिकांना पटवून देण्यात आले. वाढत्या धकाधकीच्या जीवनात शारीरिक तंदुरुस्ती टिकवून ठेवण्यासाठी दररोज किमान अर्धा तास व्यायाम करणे आवश्यक असल्याचा संदेश या रॅलीतून देण्यात आला.

या उपक्रमाचे आयोजन पडघा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक जितेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. रॅलीत पोलीस अधिकारी, कर्मचारी तसेच परिसरातील युवक, ज्येष्ठ नागरिक आणि विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सहभागी नागरिकांनी सायकलिंगच्या माध्यमातून आरोग्य जपण्याचा संकल्पही व्यक्त केला.

**सायकल रॅलीतून आरोग्यदायी जीवनशैलीचा दिला संदेश**

पडघा पोलिसांनी आयोजित केलेल्या या अभिनव उपक्रमामुळे परिसरातआरोग्याबाबत सकारात्मक जनजागृती निर्माण झाली असून नागरिकांना नियमित व्यायाम आणि तंदुरुस्त जीवनशैली अंगीकारण्यासाठी प्रेरणा मिळाली आहे. भविष्यात अशा उपक्रमांचे आयोजन अधिक व्यापक स्वरूपात करण्यात यावे, अशी अपेक्षाही नागरिकांकडून व्यक्त करण्यात आली.





# सायकल चालवा, पर्यावरण वाचवा; निफाड पोलिसांच्या सायकल रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : जागतिक सायकल दिनानिमित्त निफाड पोलिस स्टेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'संडे ऑन सायकल' मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या सायकल रॅलीत सहभागी झालेल्या सायकलप्रेमींनी सायकल चालवा, पर्यावरण वाचवा असा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविला.

रविवारी पहाटे ६ वाजता निफाड पोलिस स्टेशनच्या आवारातून पोलिस निरीक्षक गणेश गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली सायकल रॅलीला प्रारंभ झाला. यावेळी पोलिस हवालदार दीपक ढिकले, पो हवालदार कपालेश्वर ढिकले, नाईक नितीन सांगळे, पो. कॉन्स्टेबल अरविंद ढवळे, सागर जाधव , धनंजय जाधव, सिद्धार्थ वाघ, नवनाथ सूर्यवंशी, विक्रम लहाने, योगश आव्हाड, स्वप्नील शिरसाठ

यांच्यासह निफाड सायकलिस्ट ग्रुपचे प्रविण तनपुरे, पांडुरंग कडवे, संदीप गवळी, दीपक घंगाळे, राजू गवळे, रामनाथ शिंदे, विलास धारराव, योगेश निफाडे, अशोक कोल्हे, ओंकार घंगाळे, अथर्व नकाते, सूरज बागडे, तुषार कोल्हे, राम बोरसे, महेंद्र क्षीरसागर,संजय तळेकर,पूजा मगर, मनीषा वाघ आदी सहभागी झाले होते.

निफाड-शिवडी-निफाड असा मार्ग पूर्ण करत सहभागी सायकलस्वारांनी पर्यावरण संरक्षण, आरोग्य संवर्धन आणि इंधन बचतीचा संदेश दिला. रॅलीदरम्यान सायकल चालवा, पर्यावरण वाचवा अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. तसेच नागरिकांना सायकल वापराचे आरोग्यदायी व पर्यावरणपूरक महत्त्वही पटवून देण्यात आले.

सायकल रॅलीचा समारोप निफाड पोलिस स्टेशनच्या आवारात करण्यात आला. या उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती होण्यास मदत झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# वृत्तपत्राच्या बातमीची दखल; तालुका कृषी अधिकारी- रामेश्वर भुते यांची तत्परता, शेतकऱ्यांच्या पूर्वसमतींना तात्काळ मंजुरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी सिंदखेडराजा : तालुक्यातील शेतकऱ्यांच्या रखडलेल्या पूर्वसंमतींचा प्रश्न वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होताच तालुका कृषी अधिकारी रामेश्वर भुते यांनी तात्काळ दखल घेत संबंधित प्रकरणांची पडताळणी करून शेतकऱ्यांच्या पूर्वसंमतींना मंजुरी देण्याची कार्यवाही वेगाने पूर्ण केली.

पूर्वसंमती रखडल्यामुळे अनेक शेतकरी विविध कृषी योजनांच्या लाभापासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली होती. याबाबत वृत्तपत्रातून बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर कृषी विभागाने सक्रिय भूमिका घेत प्रलंबित प्रस्तावांची छाननी केली. त्यानंतर पात्र शेतकऱ्यांच्या पूर्वसंमतींना मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून कृषी योजनांचा लाभ घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. कृषी विभागाने भविष्यात अशा प्रकारचे प्रस्ताव वेळेत निकाली काढण्यासाठी आवश्यक सूचना संबंधित कर्मचाऱ्यांना दिल्याचे समजते.

तालुक्यातील शेतकऱ्यांनी वृत्तपत्राने उपस्थित केलेल्या प्रश्नाची दखल घेत तातडीने कार्यवाही केल्याबद्दल तालुका कृषी अधिकारी रामेश्वर भुते यांचे तालुक्यातील नागरिकांना कडून आभार व्यक्त केले असून अनेक दिवसापासून प्रलंबित असलेला प्रश्न तात्काळ मार्गी लागल्याने तालुक्यातील नागरिकांना मध्ये सुद्धा शासनाच्या योजने कडे लक्ष वेधले असून उत्सुकता वाढली असून तालुका कृषी अधिकारी यांचे सुद्धा कौतुक केले जात आहे.

# रयत शिक्षण संस्था, मध्य विभाग, सातारा विभागीय समन्वय समितीच्या सदस्यपदी संभाजी शिंदे यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या दि.२५/०४/२०२६ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. ८ अन्वये मध्य विभाग विभागीय समन्वय समितीच्या सदस्यपदी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती पंढरपूर व शिवसेना पंढरपूर विभाग जिल्हा प्रमुख संभाजी शिंदे यांची निवड करण्यात आलेली आहे.



संस्थेच्या कार्यात आपले वेळोवेळी सहकार्य मिळत आहे. विभागीय समन्वय समितीचे सदस्य या नात्याने संस्थेच्या कार्यात आपण अधिक सक्रीय सहभाग द्यावा, अशी आपणास विनंती करण्यात येत आहे. रयत शिक्षण संस्था सातारा सचिव विकास देशमुख यांनी सांगितले आहे.

हि निवड झाल्याबद्दल शिक्षण प्रेमी ग्रामस्थानी संभाजी शिंदे यांचा सत्कार केला.

यावेळी अंकुश डबाळ, पोपट इंगोले, उपसरपंच नितीन शिंदे, सेवनिवृत्ती तलाठी धोंडीराम शिंदे, प्रवीण शिंदे,रामचंद्र सावंत, लुकमान इनामदार,प्रशांत माळवदे,मोहन भोसले, दत्ता लोखंडे,पवन शिंदे,महेश शिंदे,शिवाजी लोखंडे, बबन साठे, सहदेव लोखंडे, आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी आभार ऋतुराज शिंदे यांनी मानले.

यावेळी संभाजी शिंदे म्हणाले की, मी आज पर्यंत प्रामाणिकपणे रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कुल व जुनिअर कॉलेज ऑफ सायन्स या विद्यालया कारिता जे काम केले आहे. त्या कार्याची दाखल घेऊन संस्थेने माझी निवड केली आहे. मी यापुढे ही माझे शैक्षणिक कार्यासाठी सहकार्य राहील. असे शिंदे म्हणाले

या निवडीबद्दल संभाजी शिंदे यांचे व्यक्तीशः व संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

## सिंदखेडराजा तहसीलदार यांना दिले विविध मागण्यांचे निवेदन

# महात्मा फुले कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनाही २ लाख रुपयांपर्यंत संपूर्ण कर्जमाफी द्या..

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत राज्य शासनाने २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी जाहीर केली असली, तरी यापूर्वी महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ चा लाभ घेतलेल्या लाखो शेतकऱ्यांवर अन्याय होत असल्याचा आरोप शेतकरी केला आहे.

यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सदरचे निवेदन मा. तहसीलदार, सिंदखेडराजा यांच्यामार्फत देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, २०१९ नंतर शेतीसाठी पुन्हा कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना सततची नापिकी, अतिवृष्टी, दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती आणि शेतमालाला न मिळालेला हमीभाव यामुळे कर्जफेड करणे शक्य झाले नाही. परिणामी अनेक शेतकऱ्यांची थकबाकी १ ते २ लाख रुपयांपर्यंत पोहोचली आहे.

सध्याच्या शासन निर्णयानुसार अशा शेतकऱ्यांना फक्त ५० हजार रुपयांची कर्जमाफी मिळणार असून उर्वरित रक्कम स्वतः भरावी लागणार आहे. म्हणजेच एखाद्या शेतकऱ्याची २ लाख रुपये थकबाकी असल्यास त्याला दीड लाख रुपये भरल्यानंतर केवळ ५० हजार रुपयांचा लाभ मिळणार आहे. आजच्या परिस्थितीत ही रक्कम भरण्याची क्षमता बहुसंख्य शेतकऱ्यांकडे नसल्याने लाखो शेतकरी या योजनेपासून वंचित राहण्याची शक्यता आहे.

त्यामुळे महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ चा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनाही पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत ५० हजार रुपये नव्हे तर २ लाख रुपयांपर्यंत संपूर्ण कर्जमाफी देण्यात यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

यावेळी शेतकरी योद्धा कृती समितीचे संस्थापक बालाजी सोसे,लोकजागर परिवारचे विश्वस्त प्रवीण गीते, प्राचार्य डी. आर. चव्हाण, गुलाबराव राठोड, कैलास भुमकर,राजू देशमुख, विष्णू घुगे तसेच इतर अनेक शेतकरी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित शेतकरी प्रतिनिधींनी राज्य शासनाला कडक इशारा देत सांगितले की, शेतकऱ्यांच्या या न्याय् मागणीची तात्काळ दखल घेऊन शासन निर्णयात सुधारणा करण्यात यावी. अन्यथा कोणतीही तारीख, वेळ किंवा पूर्वसूचना न देता राज्य शासनाने काढलेल्या कर्जमाफीच्या शासन निर्णयाची जाहीर होळी करण्यात येईल याची सर्वस्वी



जबाबदारी राज्य शासनाची राहील.

शेतकऱ्यांना न्याय मिळावा, कर्जबाजारीपणातून मुक्ती मिळावी आणि लाखो शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहू नयेत यासाठी शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# अक्कलकोट तालुक्यातील एकूण ७६ ग्रामपंचायतीचा आरक्षण सोडत कार्यक्रम ९ ते १२ जून या कालावधीत काढण्यात येणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र दिनांक २६ मे २०२६ यांनी राज्यातील सन २०२४ व २०२५ मध्ये मुदत संपलेल्या व २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या, नवनिर्मीत ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. सदर कार्यक्रमानुसार विशेष ग्रामसभा बोलावून, तहसिलदार यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली आरक्षणाची सोडत दिनांक ९ जून २०२६ ते १२ जून २०२६ या कालावधीत काढावयाची आहे.

सदर कार्यक्रमानुसार अक्कलकोट तालुक्यातील एकूण ७६ ग्रामपंचायतीचा आरक्षण सोडत कार्यक्रम ग्राम पंचायत कार्यालयाच्या ठिकाणी कार्यक्रम होणार आहे. आरक्षण सोडतीसाठी नेमून दिलेल्या ग्रामपंचायतीचे नांव तेथील अधिकारी व कर्मचारी यांचे नाव व पदनाम व विशेष ग्राम सभा बोलावून आरक्षण सोडत काढावयाची तारीख व वेळ पुढीलप्रमाणे,

मंडळ अधिकारी अक्कलकोट जबेर नदाफ- दिनांक ९ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता मातनहळ्ळी व दुपारी २ वाजता नागनहळ्ळी, दिनांक १० जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता उमरगे व दुपारी २ वाजता निमगांव, दिनांक ११ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता गळोरगी व दुपारी २ वाजता गौडगांव खु, दिनांक १२ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता बासलेगांव व दुपारी २ वाजता समर्थनगर.

मंडळ अधिकारी वागदरी भासगी आर एस- दिनांक ९ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता वागदरी व दुपारी २ वाजता साफळे, दिनांक १० जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता खैराट व दुपारी २ वाजता भुरीकवठे, दिनांक ११ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता गोगांव व दुपारी २ वाजता बादोले बु, दिनांक १२ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता सांगवी बु / हिंगणी / कोळेकरवाडी व दुपारी २ वाजता सांगवी खु/ममदाबाद/ कोळीबोट.

सहायक महसूल अधिकारी एस एन धर्मसाले,- दिनांक १० जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता शिरसी/ काळेगांव/बादोले खु.

मंडळ अधिकारी वागदरी विठ्ठल मेकाले - दिनांक ९ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता चपळगांव / बावकरवाडी व दुपारी २ वाजता हन्नूर, दिनांक १० जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता बऱ्हाणपूर व दुपारी २ वाजता हालहळ्ळी अ, दिनांक ११ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता डोंबरजवळगे / अकतनाळ व दुपारी २ वाजता पितापूर, दिनांक १२ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता चपळगांववाडी.

मंडळ अधिकारी मैंदर्गी श्रीमती एस आय शेख- दिनांक ९ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता तोरणी व दुपारी २ वाजता भोसगे, दिनांक १० जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता बणजगोळ व दुपारी २ वाजता संगोगी आ, दिनांक ११ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता मिरजगी व दुपारी २ वाजता चिक्केहळ्ळी, दिनांक १२ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता सातनदुधनी व दुपारी २ वाजता कल्लापवाडी.

मंडळ अधिकारी दूधनी प्रदीप जाधव- दिनांक ९ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता इब्राहिमपूर व दुपारी २ वाजता मुगळी, दिनांक १० जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता बोरोटी खु. व दुपारी २ वाजता चिंचोळी मै, दिनांक ११ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता बबलाद व दुपारी २ वाजता सिन्नूर, दिनांक १२ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता बोरोटी बु व दुपारी २ वाजता नागोरे.

मंडळ अधिकारी जेऊर रमाकांत भासगी- दिनांक ९ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता ब्यागेहळ्ळी व दुपारी दोडयाळ, दिनांक १० जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता गौडगांव बु व दुपारी २ वाजता जेऊर, दिनांक ११ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता कर्जाळ.

मंडळ अधिकारी नागणसूर महादेव स्वामी- दिनांक ९ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता तोळणूर व दुपारी २ वाजता हैद्रा, दिनांक १० जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता मराठवाडी व दुपारी २ वाजता नागणसूर, दिनांक ११ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता गुरववाडी व दुपारी २ वाजता उडगी.

मंडळ अधिकारी तडवळ चारूदत्त काकडे - दिनांक ९ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता तडवळ व दुपारी २ वाजता गुड्डेवाडी, दिनांक १० जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता चिंचोळी नं व दुपारी २ वाजता आळगे, दिनांक ११ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता कोर्सेगांव व दुपारी २ वाजता कुमठे, दिनांक १२ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता मुंढेवाडी व दुपारी २ वाजता शेगांव.

मंडळ अधिकारी करजगी मल्लीनाथ सुतार - दिनांक ९ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता सुलेरजवळगे व दुपारी २ वाजता कल्लहिप्परगे, दिनांक १० जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता आंदेवाडी बु, व दुपारी २ वाजता आंदेवाडी खु, दिनांक ११ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता देविकवठे व दुपारी २ वाजता हंद्राळ, दिनांक १२ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता हिळ्ळी.

मंडळ अधिकारी किणी रामकुमार कोळी - दिनांक ९ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता किणी व दुपारी २ वाजता काझीकणबस, दिनांक १० जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता किणीवाडी व दुपारी २ वाजता कुरनूर, दिनांक ११ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता मोटयाळ व दुपारी २ वाजता सिंदखेड, दिनांक १२ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता किरनळ्ळी व दुपारी २ वाजता गांव चुंगी. अशी माहिती तहसिलदार अक्कलकोट विनायक मगर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

# बोरगाव येथील वस्तीवर राहणाऱ्या हरिविजय संजय माळी याची मुंबई पोलीस म्हणून निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब : कळंब तालुक्यातील बोरगाव बुद्रुक येथील हरिविजय संजय माळी याने दोन वर्षाच्या अथक परिश्रमानंतर मुंबई पोलीस मध्ये आपले स्वप्न साकार करत यश मिळवले. याबाबतची अधिक माहिती अशी की, हरिविजय संजय माळी हा अतिशय गरीब परिस्थितीत आपलं बारावीपर्यंत शिक्षण पूर्ण करून आणि पोलीस भरतीची तयारी करून मुंबई पोलीस मध्ये त्यांनी यश मिळवले. त्याचे प्राथमिक शिक्षण गावातीलच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता सातवी पर्यंत पूर्ण झाले . माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्याने पोलीस व्हायचे ठरविले आणि दोन वर्ष अथक मेहनत आणि परिश्रम करून त्यांनी यशाला गवसणी घातली. या यशाबद्दल गावकऱ्यांनी त्याचा जाहीर सत्कार केला. गावातील सर्वांनाच त्याच्या यशाचे हे अप्रूप वाटत आहे. या यशाबद्दल त्याचे आणि आई-वडीलांचे गावातील श्री.मनोज माळी, नागूराव खांडेकर, अंगद माळी, बापूराव बंडगर, किरण माळी,यांनी अभिनंदन करत सत्कार केला. त्याला यासाठी मित्रांचीही खंबीर साथ मिळाली.

# अमोल लोळे पाटील यांची पुरंदर तालुका पोलीस पाटील संघाच्या अध्यक्षपदी निवड




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : पुरंदर तालुका पोलिस पाटील संघाच्या नूतन कार्यकारिणीच्या पदग्रहण सोहळ्यात तालुका अध्यक्ष पदासाठी अमोल लोळे पाटील निवडले गेले, तर उपाध्यक्षपदी राहुल शिंदे पाटील आणि तानाजी काकडे पाटील यांची निवड करण्यात आली. मावळते अध्यक्ष मोहन इंगळे पाटील यांची पुणे जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल राज्याध्यक्ष बाळासाहेब शिंदे पाटील यांनी नव्या कार्यकारिणीला मान्यता देत पदाधिकाऱ्यांना सनद प्रदान केली. यावेळी माजी आमदार संजय जगताप आणि माजी आमदार अशोक टेकवडे यांनी नूतन कार्यकारिणीचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास माजी आमदार संजय जगताप, अशोक टेकवडे, सहायक पोलिस निरीक्षक वैभव सोनवणे, जि.प.सदस्य हरिभाऊ लोळे, अजय इंगळे, रुपाली ताई झेंडे,सभापती अमित झेंडे, उपसभापती प्रवीण जगताप,सदस्या स्मिता निगडे, रुपाली कटके, योगिता कांबळे नायब तहसीलदार संदीप पाटील, दादा काळभोर, रोहिणी हांडे, पुणे जिल्हा अध्यक्ष अविनाश सेंडगे, मोनिका ताई कचरे,विनायक गायकवाड, विजय कुंजीर, उमेश तळेकर,कैलास जाधव, सारिका झेंडे,पाणवडी येथील आजी माजी सरपंच व ग्रामस्थ आणि पुणे जिल्ह्यातील पदाधिकारी पोलीस पाटील बंधू भगिनी मोठया संख्येने उपस्थित होते.

**नवीन कार्यकारिणी**

अध्यक्ष - अमोल लोळे पाटील, उपाध्यक्ष - राहुल शिंदे पाटील, तानाजी काकडे पाटील, कार्याध्यक्ष - मनोहर पायगुडे पाटील, रूपाली बोरकर पाटील, सचिव - विजय पोमण पाटील, कार्यकारी अध्यक्ष - पूजा यादव पाटील, सचिन होले पाटील, खजिनदार - दीपक जाधव पाटील, सारिका खवले पाटील, संघटक - रूपाली कुंभारकर पाटील, गोपीनाथ मुळीक पाटील, रूपाली सोनावणे पाटील.

# शिक्षकांच्या हितासाठी राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघटना अखंड पाठीशी राहिल : मा.आमदार श्री बाळाराम पाटील



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : सुधाकर रणदिवे, पनवेल राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाचे पहिले राज्यस्तरीय अधिवेशन व पुरस्कार प्रदान सोहळा दि. ५ जून २०२६ रोजी व्ही. के. हायस्कूल पनवेल येथे मोठ्या उत्साहात व दिमाखदार वातावरणात संपन्न झाले. राज्याच्या विविध जिल्ह्यांतून आलेल्या शिक्षक,शिक्षिका तथा संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या उत्स्फूर्त उपस्थितीमुळे अधिवेशनाला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाच्या स्वागताध्यक्ष पदी माजी शिक्षक आमदार तथा संघटनेचे संस्थापक मार्गदर्शक बाळाराम पाटील तर अध्यक्ष स्थानी संघटनेचे राज्याध्यक्ष अनिल नाचपल्ले हे होते. प्रमुख उपस्थितांमध्ये , लोहारा/ उमरगा मतदार संघाचे विधानसभा सदस्य आमदार प्रवीण स्वामी, पुणे विभाग शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार दत्तात्रय सावंत यांच्यासह संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपल्ले, सरचिटणीस संतोष भोजने, उपाध्यक्ष सुखदेव भालेकर, राजेंद्र खैरनार, संपर्कप्रमुख मंगेश सुवर्णकार, प्रसिद्धीप्रमुख धनाजी घरत, लहू राक्षे, रायगड जिल्हाध्यक्ष धनाजी घरत, खाजगीप्रमुख राजन पाटील, राज्यसंघटक प्रशांत शेवाळे, प्राध्यापक विभागप्रमुख श्रीम. प्रतिभा पगार , महिला अध्यक्षा रेखाताई सुडे , महिलाचिटणीस विनया जाधव कार्याध्यक्ष लीना मगर,नाशिक विभागप्रमुख संदीप गीते, छ.सांभाजीनगर विभाग प्रमुख विजयकुमार तेलंग, रायगड पदाधिकारी रवी पाटील, उमेश पाटील, विद्याधर पाटील, भरत गुरव यांच्यासह सर्व जिल्हाध्यक्ष तसेच राज्यभरातील विभागीय, जिल्हा व तालुका पदाधिकारी उपस्थित होते.

प्रथमतः ५ जून जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून तुळशीच्या रोपट्याला मान्यवरांच्या हस्ते जलदान करण्यात येऊन त्यानंतर सर्व महापुरुषांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले ..

आमदार बाळाराम पाटील यांची रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभाग चेअरमन पदी फेर निवड झाल्यामुळे संघटनेच्या वतीने भव्य असा सत्कार करण्यात आला सदर अधिवेशनात शिक्षक, विद्यार्थी, शाळा, शिक्षण व्यवस्था व सामाजिक बांधिलकी यांच्याशी संबंधित एकूण ३० महत्त्वपूर्ण ठराव मांडून त्यास उपस्थितांची मंजुरी घेण्यात आली. उपस्थित प्रतिनिधींनी हात उंचावून एकमताने सर्व ठरावांना अनुमोदन दिले. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतात शिक्षकांच्या न्याय्य मागण्या,शैक्षणिक प्रश्न, विद्यार्थ्यांचे हित आणि शिक्षण क्षेत्रातील विविध समस्यांबाबत संघटितपणे लढा उभारण्याची गरज व्यक्त केली. संघटनेच्या माध्यमातून शासन दरबारी प्रभावीपणे प्रश्न मांडून ते सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही उपस्थित पदाधिकाऱ्यांनी दिली.राज्यातील ओबीसी बहुजन शिक्षकांना एकत्र आणून त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व संघटनात्मक प्रश्नांसाठी भक्कम व्यासपीठ निर्माण करण्याच्या दृष्टीने हे अधिवेशन ऐतिहासिक ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या शेवटी राज्यातील आदर्श व गुणवंत शिक्षिका शिक्षक यांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार, क्रांतीसुर्य महात्मा फुले आदर्श शिक्षक पुरस्कार, डॉ. पंजाबराव देशमुख ओबीसीरत्न पुरस्कार अशा ३ पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अधिवेशनाचे सूत्रसंचालन महाराष्ट्रातील प्रसिद्ध सूत्रसंचालक जतीन कदम व प्रतिभा क्षीरसागर/ कदम या उभयंतानी आपल्या बहारदार शैलीत केले तर आभार सुखदेव भालेकर यांनी मांडले.

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनची १७४ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

# विज्ञानाशी सुसंगत असेल तेच बुद्धाचे तत्त्वज्ञान समजावे : बी. बी. मेश्राम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : दि. ७ जून : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघ यांच्या संयुक्त विद्यमाने अस्पृश्यांना बौद्ध धर्माशिवाय दुसरा कोणताही अभ्युदयाचा मार्ग नाही. या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक विधानावर आधारित १७४ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संस्थेच्या साकेतनगर येथील कार्यालयात ७ जून २०२६ ला उत्साहात संपन्न झाली.



कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम होते. अध्यक्षीय मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, २५ मे ते ६ जून १९५० या कालावधीत सिलोन बुद्धिस्ट काँग्रेसद्वारे आयोजित जागतिक बुद्ध परिषदेत भारताचे प्रतिनिधी म्हणून तत्कालीन कायदामंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहभागी झाले होते. या परिषदेत त्यांनी बौद्ध धर्माचा इतिहास, त्याचा अस्त व उदय, नैतिक मूल्यांचे महत्त्व, ब्राह्मणी धर्माला बौद्ध धर्माने दिलेले आव्हान तसेच अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी बौद्ध धर्माचे अनन्यसाधारण महत्त्व याविषयी सखोल विवेचन केले होते.

बी. बी. मेश्राम पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बौद्ध धर्मावरील विचार समजून घेण्यासाठी पी. लक्ष्मी नरसू लिखित इसेन्स ऑफ बुद्धिझम या ग्रंथाला त्यांनी लिहिलेली प्रस्तावना अभ्यासणे आवश्यक आहे. बुद्धत्वाचे आचरण करताना एखादी बाब विज्ञानाशी सुसंगत आहे की नाही, याची चिकित्सक तपासणी केली पाहिजे. जे विज्ञाननिष्ठ व तर्कसंगत आहे, तेच बुद्धाचे खरे तत्त्वज्ञान समजावे.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना ॲड. राहुल गायकवाड यांनी जातीव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी समाजात आंतरजातीय विवाहांना विरोध करण्यात आला आणि त्यातून अनेक सामाजिक अनिष्ट प्रथा उदयास आल्या, असे सांगितले. समाजात परस्पर स्नेह, समता व मानवता वृद्धिंगत करणारे आचरण प्रत्येकाने स्वीकारले पाहिजे, असे त्यांनी प्रतिपादन केले.

प्रमुख वक्त्या डॉ. कल्पना गंगावणे यांनी बुद्धांचे व्यक्तिमत्त्व इतर धर्मसंस्थापकांपेक्षा कसे वेगळे होते? हे समजून घेण्याची आवश्यकता व्यक्त केली. अत्त दीप भव या तत्त्वानुसार ध्यान साधना व आत्मपरिष्कार केल्यास बुद्धत्वाकडे वाटचाल करता येते, असे त्या म्हणाल्या. समाजातील नेतृत्वाच्या अभावाकडे लक्ष वेधत त्यांनी प्रत्येकाने नियमितपणे बुद्ध विहारात जाऊन सामाजिक व वैचारिक बांधिलकी जोपासावी, असे आवाहन केले.

यावेळी समन्वयक उद्योजक शशिकांत काळे यांनी बौद्ध धर्माचे आचरण आणि सामाजिक ऐक्य यांचे महत्त्व अधोरेखित केले. उपवर्गीकरणाच्या पार्श्वभूमीवर विविध घटकांमध्ये वाढणारी द्वेषभावना समाजहितासाठी घातक असल्याचे त्यांनी नमूद केले. राज गायकवाड यांनी समाजातील पाखंडवाद नष्ट करण्यासाठी कार्य करण्याचे आवाहन केले. अर्चित मेश्राम यांनी अधिक अभ्यासपूर्वक विचार मांडण्याचा संकल्प व्यक्त केला. ॲड. डी. बी. मेश्राम यांनी विनयपिटक, सुत्तपिटक व अभिधम्म पिटक यांच्या अभ्यासातील विसंगती दूर करण्याची गरज व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्प व पुष्पमाला अर्पण करून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक उद्योजक प्रा. विलास कटारे यांनी केले. सूत्रसंचालन ॲड. विलास रामटेके यांनी तर आभार प्रदर्शन उद्योजक शशिकांत काळे यांनी केले.

कार्यशाळेस विविध क्षेत्रांतील अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ते व प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.